CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २३ जुलै २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : २९४ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## रिक्षाच्या धडकेने पादचारी ठार

**सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या रिक्षाच्या धडकेने ४० वर्षीय अनोळखी पादचारी इसम ठार तर रिक्षा उलटल्याने चालक जखमी झाला. हा अपघात रेल्वेस्थानक रोडवरील डीआरएम कार्यालयाजवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडला. युनुस इस्माईल मुल्ला (वय ५० रा.संजय गांधीनगर झोपडपट्टी नं.२) असे जखमी झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. ते रविवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास आपली एमएच१३-बीव्ही-१५५८ या क्रमांकाची रिक्षा घेऊन मोदी ते रेल्वे स्टेशनच्या दिशेने निघाले होते. डीआरएम कार्यालयाच्या पुढे भाजी मार्केट जवळ समोरील पादचाऱ्याला रिक्षा धडकून उलटली. त्यात अनोळखी इसम आणि रिक्षा चालक असे दोघे जखमी झाले. शासकीय रुग्णालयात दाखल केले असताइसम हा उपचारापूर्वी मयत झाला.

## पवार-शिंदेंमध्ये तासभर बैठक



**मुंबई** : आरक्षणाच्या मुद्द्यावरून १५ मिनिटे चर्चा झाली आहे. या चर्चेत एकनाथ शिंदे यांनी शरद पवार यांना सरकारने मराठा आरक्षणप्रश्नी आतापर्यंत काय प्रयत्न केले, याबाबत माहिती दिली. शरद पवार यांनी याआधी सरकार मनोज जरांगे किंवा लक्ष्मण हाके यांना काय आश्वासन देत आहे याबाबत विरोधी पक्षाला काहीच माहिती नसते असे बोलून दाखवले होते. त्यानंतर आता शिंदे यांनी सरकारने मराठा आरक्षणासाठी आतापर्यंत काय काय केले आहे, याची माहिती शरद पवार यांना दिली आहे. या भेटीनंतर आता विरोधी पक्ष काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तिहेरी हत्याकांडाने हादरला महाराष्ट्र


## गर्भपात करताना प्रियशीचा मृत्यू | मृतदेहाची लावली विल्हेवाट

## बिंग फुटू नये म्हणून दोघा चिमुरड्यांना फेकले इंद्रायणी नदीच्या पाण्याच्या प्रवाहात

**पुणे/प्रतिनिधी**

विवाहबाह्य संबंधातून गर्भवती राहिलेल्या प्रेयसीचा गर्भपात करताना मृत्यू झाला. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावताना प्रेयसीच्या दोन्ही मुलांना इंद्रायणीच्या नदी पात्रात जिवंत फेकून देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्याच्या मावळ तालुक्यातील ही धक्कादायक आणि हादरून संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणारी घटना आहे. निर्दयीपणाचा अक्षरश: कळस झालेली ही संतापजनक घटना ९ जुलै रोजी घडली असून या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी प्रियकर आणि त्याच्या मित्राला तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. समरीन निसार नेवरकर (वय- २५) असे मृत महिलेचे नाव असून इशांत निसार नेवरेकर (वय-५ ) इजान निसार नेवरेकर (वय- २) असे फेकून दिलेल्या दोघांची नावे आहेत.

- निर्दयीपणाचा कळस
- अत्यंत भयावह घटनेने समाजमनाला धक्का
- संशयित प्रियकरासह मित्राला ठोकल्या बेड्या





पुणे : प्रेयसीसह दोन मुलांना याच त्या इंद्रायणी नदीच्या पाण्याच्या प्रवाहात फेकण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात घटनास्थळावर माहिती घेताना ताब्यातील संशयित आरोपींसह पोलीस.

विशेषत्वे, दया ना मया न दाखवता दोन्ही मुलांना नदीच्या प्रवाहात जीवंत फेकून दिल्याच्या घटनेने समाज मन सुन्न झाले असून या घटनेची राज्यभर चर्चा सुरु झाली आहे.

अधिकची माहिती अशी की, गर्भवती प्रेयसीचा गर्भपात करण्यासाठी तिला ६ जुलै रोजी रुग्णालयात आणण्यात आले होते. ६ जुलै रोजी गर्भवती प्रेयसीला आणि तिच्या ५ आणि २ वर्षीय मुलाला घेऊन प्रियकर गर्जेंद्र दगडखैर कळंबोली येथे गेला. तेथील अमर रुग्णालयात प्रेयसीचं गर्भपात करण्यात आला. मात्र डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळं प्रियसीचा ८ जुलैला मृत्यू झाला. त्यानंतर गर्भपात करून देणाऱ्या एजंट महिलेने मध्यस्थी करत मृतदेह गर्जेंद्रचा मित्र रविकांत गाईकवाडच्या सोबतीनं मावळमध्ये आणला आणि गर्जेंद्र आणि रविकांतने ९ जुलैच्या अंधारात इंद्रायणी नदीच्या वाहत्या प्रवाहात मृतदेह फेकून दिला. या दरम्यान प्रेयसीची दोन्ही मुले रडू लागली. आता या दोघांमुळं आपलं बिंग फुटेल, या भीतीने निर्दयीपणाचा कळस गाठला. कोणतीही दया-मया न दाखवता त्या दोन्ही मुलांना ही त्याच नदीच्या प्रवाहात जीवंत फेकून दिलं.

### पोलिसांकूडन अनेकदा कसून चौकशी; मात्र दोघांकडून उडवाउडवीची उत्तरे

घटनेच्या दुसऱ्या दिवसांपासून हे दोघे ही काही घडलंच नाही, असे वावरू लागले. दरम्यानच्या काळात प्रेयसीसोबत तिच्या कुटुंबियांचा संपर्क होत नसल्यानं, तिच्या कुटुंबीयांनी तळेगाव एमआयडीसी पोलिसांत तिघे हरवल्याची तक्रार दिली. मग पोलिसांनी तपासाची चक्र फिरवली. प्रेयसीला गजेंद्रने अनेकदा फोनवरून संपर्क साधल्याचं आणि गजेंद्रने मित्र रविकांतशी त्याच दरम्यान फोनवर अनेकदा बोलल्याचं तपासात समोर आलं. या दोघांची पोलिसांनी अनेकदा कसून चौकशी केली, मात्र दोघे ही उडवाउडवीची उत्तरे देत होती. शेवटी पोलिसी खाक्या दाखवण्यात आला अन् दोघांनी घडला प्रकार कबूल केला. तळेगाव पोलिसांनी या दोघांना बेड्या ठोकल्या असून पुढील कारवाई सुरू आहे.

### नराधमांना फाशीवर लटकवा; 'त्या' दोघा निष्पाप चिमुरड्यांचा दोष काय?

घडलेल्या भयानक घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी हंबरडा फोडला.'त्या नराधमांना फाशीवर लटकवा, त्या दोघा निष्पाप चिमूरड्यांचा दोष काय?' होता असा सवाल नातेवाईकांनी केला आहे.



पुणे : हंबरडा फोडताना नातेवाईक

## देशातील कोट्यवधी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी; जुनी पेन्शन लागू होणार नसल्याचे स्पष्टीकरण

- खासदार प्रणिती शिंदे यांनी उपस्थित केला होता प्रश्न
- लढा देणाऱ्या संघटनांमध्ये 'अब शांती शांती'





**नवी दिल्ली** : लोकसभा निवडणुकांत खासदारकीची माळ गळ्यात पडल्यानंतर सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी सभागृहात पहिलाच प्रश्न जुन्या पेन्शन संदर्भाने विचारला होता. निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. यासंदर्भाने सरकारी कर्मचाऱ्यांनी मोठे आंदोलनही उभारले होते, त्यावेळी राज्य सरकार याबाबत काम करत असून निश्चित मार्ग काढू असे राज्य सरकारने कळवले आहे.

मात्र, अद्यापही राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शनचा लाभ मिळत नाही. तर, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांचीही तीच मागणी आहे. त्याच अनुषंगाने, खासदार प्रणिती शिंदेंनी जुनी पेन्शन योजना संदर्भात संसदेत प्रश्न विचारला. पण, केंद्र सरकारने स्पष्ट शब्दात नकार दिल्याने कोट्यवधी कर्मचाऱ्यांची निराशा झाली आहे.

जुन्या पेन्शनसाठी लढा देणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी निराशाजनक बातमी आहे. कारण, जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात सरकारचा कोणताही विचार नाही, असे स्पष्ट शब्दात केंद्र सरकारने खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे. जुन्या पेंशन योजनेबाबत काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्र सरकारला प्रश्न विचारला होता. राज्य व केंद्रातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना सुरू करण्यासाठी सरकारची काही योजना आहे का?, असा प्रश्न प्रणिती शिंदे यांनी संसद सभागृहातील उपस्थितीदरम्यान विचारला. मात्र, यासंदर्भातील प्रश्नावर सरकारने दिलेल्या उत्तराने कोट्यवधी सरकारी कर्मचाऱ्यांची निराशा होणार आहे. जुन्या पेंशन योजनेबाबत सरकारचा कोणताही विचार नाही, असे स्पष्ट उत्तर केंद्र सरकारने दिले आहे. त्यामुळे, गेल्या अनेक वर्षापासून जुन्या पेन्शन योजनेबाबत आक्रमक असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांची घोर निराशा झाली आहे. आता, सरकारी कर्मचारी पुन्हा आंदोलनाचा किंवा संपाचा मार्ग अवलंबतात का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

(पान ५ वर)



## उजनी अद्याप उणे पातळीतच पुणे जिल्ह्यातील पावसावर मदार

- धरण प्लसमध्ये येण्यासाठी १२ टीएमसी पाण्याची गरज
- जलाशय शंभर टक्के भरण्याला लागेल तब्बल ७० टीएमसी

**सोलापूर** : सोलापूरसह पुणे आणि अहमदनगर जिल्ह्याची वरदायिणी मानल्या जाणाऱ्या उजनी धरणामधील पाणी पातळीत अद्याप म्हणावी तशी वाढ झालेली नाही. धरण सध्य स्थितीमध्येही उणे पातळीत आहे.

तथापि, पुणे जिल्ह्यात पुढील काही महिन्यात होणाऱ्या पावसावरच हे धरण भरण्याची मदार राहणार आहे. धरण प्लस पातळीत येण्यासाठी आणखीन १२ टीएमसी तर पूर्ण भरण्यासाठी ७० टीएमसी पाण्याची गरज आहे. यंदा जूनमध्ये मृग नक्षत्राच्या दमदार पावसामुळे उजनी धरणात पाणीसाठा वाढण्यास सुरुवात झाली खरी; परंतु गेल्या दीड महिन्यात पावसाळा सुरू होऊनसुद्धा धरण अद्याप वजा पातळीतच राहिले आहे. वजा पातळीतून बाहेर येण्यासाठी आणखी १२ टीएमसी पाणीसाठ्याची गरज आहे. तर धरण शंभर टक्के भारण्यासाठी तब्बल ७० टीएमसी पाणीसाठ्यापर्यंत मजल गाठावी लागणार आहे. उजनीच्या वरच्या भागात, पुणे जिल्ह्यातील लहानमोठी १९ धरणे भरल्यानंतर उजनी धरणात पाणीसाठा वाढणार आहे. त्यादृष्टीने पुढील (पान ५ वर)

## मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी मुख्यमंत्र्यांची दिलासादायक घोषणा

- जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी वाढवली सहा महिन्यांची मुदत



**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिलासा देणारा मोठा निर्णय घेतला आहे. २०२४-२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणीही दूर होतील.

व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवेशासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यामुळे दहावी बारावीचा निकाल लागल्यानंतर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे असंख्य अर्ज येत असतात. त्यातच, कुणबी (पान ५ वर)

### कुणबी नोंदीसाठी जिल्हानिहाय प्रक्रिया सुरू

जात प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणीसाठी 'महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग अधिनियम २०००' आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या आंतरवली सराटी गावातील आंदोलनानंतर शासनाने मराठा-कुणबी, कुणबी-मराठा नोंदी शोधण्याची जिल्हानिहाय प्रक्रिया सुरू केली. त्यासाठी जात पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी कशी करावी याची कार्यपद्धती न्या. शिंदे समितीने आखून दिली आहे. त्यामध्ये १२ नवे दस्तऐवज सुचवण्यात आले होते.

### आता 'हे' नवीन १२ पुरावे...

न्या. शिंदे समितीच्या शिफारशीमध्ये सहनिबंधक कार्यालयांमधील खरेदीखत, करारखत, साठेखत, इसारा पावती, भाडेचिठ्ठया, कारागृह विभागाकडील कच्चा कैद्याच्या नोंदी, भूमिअभिलेख विभागाकडील हक्क नोंदणीपत्रे, पोलीस विभागाचे पंचनामे, उत्पादन शुल्क विभागाकडील अनुज्ञप्ती, वक्फच्या मुंतखब आदी १२ प्रकारच्या अभिलेखांचे पुराव्यासाठी पर्याय देण्यात आलेले. तसंच, जात प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणीसाठी २३ दस्तऐवजांमधून पुरावा सादर करता येणार आहे. हा नियम सर्व प्रवर्गाच्या जात प्रमाणपत्रांसाठी लागू राहील, असे सामाजिक न्याय विभागातील सूत्रांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुम्ही आमच्या घरात घुसल्यावर, आम्ही काय करायचं !

कल्याण
690-55-267

मुंबई
770-40-136

## जिल्ह्यातील २१ हजार अपूर्ण घरकुलांच्या लाभार्थ्यांवर जुलैनंतर कारवाई; वारंवार ताकीद देऊनही घरकुल पूर्ण करण्यासाठी लाभधारकांचा कानाडोळा

**सोलापूर/प्रतिनिधी**

घरकुल उभारणीचे हप्ते घेऊनसुद्धा ती अपूर्ण ठेवणाऱ्या जिल्ह्यातील साधारण २१ हजार लाभार्थ्यांवर प्रशासनाकडून होणार कारवाई अटळ आहे. जुलैनंतर कारवाई हाती घेण्यात येणार आहे. अर्धवट घरकुलांची बांधकामे पूर्ण करण्यासाठी वारंवार मुदत देऊनसुद्धा या संबंधित लाभार्थ्यांनी घरकुलांचे कामे पूर्ण केली नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलला जाणार हे निश्चित आहे. जिल्ह्यात वर्षभरात साधारण ५७ हजार घरकुलांची कामे पूर्ण झाली असून त्यासाठी ७७२ कोटींचा निधी वितरीत करण्यात आली आहे.

साधारण २०१६ -१७ पासून सोलापूर जिल्ह्यातील गरीब दारिद्रय रेषेच्या खाली असणाऱ्या लोकांसाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक दुर्बल घटक, केशरी शिधा पत्रिका धारकांसाठी स्वस्तात घरे देण्याची घरकुल योजना

### घरकुलांसाठी ७७२ कोटीचा निधी वितरित | ५७ हजार घरकुले पूर्ण

सुरुवात करण्यात आली. घरकुल योजनेचा हेतू सफल होण्यासाठी ग्रामपंचायत ठराव, यादी,मान्यता, जातीचा दाखले, उत्पन्न दाखला अशी कागदोपत्री सादर केल्यानंतर मंजुरी दिली जाते. मंजुरी नंतर जसे काम तसे बिलाचे टप्पे, ठरविण्यात आले. प्रत्येक घरासाठी ग्रामीण एक लाख वीस हजार प्रमाणे देण्यात आले. विविध घरकुल



योजनेतील लाभार्थ्यांना हफ्ते वितरीत करूनही घरकुल पुर्ण केले नाहीत अशा २१ हजारांहून अधिक लाभार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे.सध्या सूचना दिली जात असून घरकुल पूर्ण न केल्यास कठोर कारवाई केली जाणार आहे असे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

मंजुरी मिळालेल्या घरकुलाच्या लाभार्थ्यांना १ ला हफ्ता -१५ हजार, २-४५ हजार, ३ -४० आणि घरकुल पूर्ण झाले आणि पूर्णत्वाचे प्रमाण पत्र सादर केल्यानंतर ५ हजारचा अंतीम हफ्ता देण्यात येतो. हफ्ते आले आणि खर्च झाले घरकुल पूर्ण कधी केली जाणार, एकाच नावाने अनेक घरे देण्यात आली घरकुल कसे पूर्ण होणार, गरजवंत राहिले बाजूला आणि इतर लोकांची नावे समाविष्ट झाली आणि त्याच्याच खात्यामध्ये हफ्ते जमा झाले.आलेले हफ्ते इतरत्र वापर झाल्याने घरे पूर्ण होत नसल्याने आता कारवाई केली जाणार आहे.

काही तांत्रिक कारणाशिवाय वाळूचा वाढीव भाव, खडी,सिमेंट आणि इतर अडचणी असल्याने लाभार्थ्यांची घरकुल अपूर्ण आहेत. ती पूर्ण करुन घेण्यासंबंधी प्रयत्न चालू असून जुलै अखेरपर्यंत पूर्ण करुन घेण्याचे नियोजन आहे. त्यांनतर ही घरकुल अर्धवट ठेवल्यास संबंधित लाभार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

**- सुशील ठोंबरे**
प्रकल्प संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

CMYK